# प्रतिज्ञापत्र

**'अशोक व्हटकर ह्यांचे कादंबरीलेखन'** ह्या विषयावरील प्रस्तुत प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा हिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

**स्थळ : कोल्हापूर**

**दिनांक :** ३०/०६/२००८

**(कांबळे सतीश मारुती)**

**संशोधक**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कांबळे सतीश मारुती** ह्यांनी **'अशोक व्हटकर ह्यांचे कादंबरीलेखन'** ह्या विपयावरील संशोधनकार्य माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्यरित्या केले असून ते समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे. ही प्रबंधिका ह्यापूर्वी कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरची प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

**स्थळ : कोल्हापूर**

**दिनांक :** ३०/०६/२००८

**(डॉ. अविनाश सांगोलेकर)**

**संशोधक मार्गदर्शक**

# मनोगत

शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. (मराठी) परीक्षेसाठी 'अशोक व्हटकर ह्यांचे कादंबरीलेखन' ही प्रबंधिका सादर करीत असताना मला अतिशय आनंद होत आहे.

१९६० नंतर मराठी साहित्यविश्वात दलित साहित्याने मोलाचे योगदान दिले आहे. कथा, कादंबरी, नाटक, काव्य, चरित्र, आत्मचरित्र ह्याविषयी दलित साहित्यामध्ये भरपूर लेखन झालेले दिसून येते. अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्य लेखनाचा प्रभाव, ठसा उमटविला आहे. त्या साहित्यिकांपैकी 'अशोक व्हटकर' हे एक महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. त्यांच्या मेलेलं पाणी' (१९८२) आणि '७२ मैल' (१९८९) ह्या दोन कादंबऱ्यांचा अभ्यास करायचा असे मनोमनी ठरविले.

मराठी साहित्यविश्वात सर्वांनाच परिचित असलेले, मराठी गजलविश्वाचा सखोल अभ्यास असलेले डॉ. अविनाश सांगोलकर मला मार्गदर्शक म्हणून लाभले. माझ्या कौटुंबिक आणि शैक्षणिक अडचणी केवळ तेच समजू शकले असे मी मानतो. गरिबीतून शिक्षण घेत असता विद्यार्थ्यांना त्यांच्यासारखे शिक्षक मिळावेत हीच मन:पूर्वक सदिच्छा. त्यांच्याविषयी मी कायमच ऋणी राहण्यात आनंद मानतो.

हा अभ्यास करण्यासाठी संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, दिवाळी अंक, वृत्तपत्रे इ. साहित्य उपलब्ध होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे ग्रंथालय, शिरढोण येथील जयहिंद वाचनालय ह्यांची मोलाची मदत झाली. तसेच शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. कृष्णा किरवले व त्यांचे अन्य सहकारी डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रणधीर शिंदे ह्यांचे बहुमोल असे मार्गदर्शन मिळाले. ह्या सर्वांचा मी ऋणी आहे.

अशिक्षित असूनही शिक्षणाबद्दल आस्था बाळगणारे माझे आईवडील ह्यांच्या प्रेरणेमुळेच आणि भाऊ रुपेश, बहिण रेशमा ह्यांच्या मदतीमुळे मी एम्.फिल्. चे शिक्षण घेऊ शकलो.

एम्.फिल्. करत असताना अभ्यासाच्यावेळी प्रदीप कांबळे सर, प्रदीप चोपडे सर, शैलेश कांबळे सर, संजय गायकवाड सर, महादेव कांबळे, जयसिंग कांबळे, रमेश कोरे, ह्या मित्रांचेही योगदान महत्त्वाचे असे आहे. ही प्रबंधिका पूर्ण करण्यामध्ये सहकार्य करणाऱ्या टंकलेखिका सौ. शितल अशोक पसारे (राजोम टायपिंग सेंटर) यांनी जास्तीत जास्त अचूक व वेळेवर काम पूर्ण करुन दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

**स्थळ : कोल्हापूर**

**दिनांक :** ३०/६/२००८

**(कांबळे सतीश मारुती)**

**एम्.ए., बी.एड्.**